शासनमान्य खाजगी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या “अ” श्रेणीतील, १२३ विनाअनुदान तत्वावरील, अपंगांच्या विशेष निवासी / अनिवासी शाळा/ कर्मशाळांना अनुदान देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्र. इडीडी-२०१७/प्र.क्र.१०८/भाग-२/अ.क.१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०४ मे, २०१८.

वाचा -: १) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक इडीडी-२००३/प्र.क्र.३४०-भाग ३/ सुधार-३, दि.१८ ऑगस्ट,२००४.
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक इडीडी-२०१२/ प्र.क्र. ६७/अ.क.१, दि.८ एप्रिल, २०१५.
३) शुध्दीपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक इडीडी-२०१२/ प्र.क्र. ६७/अ.क.१, दि.१३ एप्रिल, २०१६.
४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक इडीडी-२०१७/ प्र.क्र. १०८/भाग-२/अ.क.१, दि.१८.१.२०१८.
५) शासन शुध्दीपत्रक क्र.इडीडी २०१८/प्र.क्र.१०७/अ.क.१, दि.१३.४.२०१८

शासन शुध्दीपत्रक -:

शासन मान्य खाजगी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या, “अ” श्रेणीमधील, विना अनुदानित, अपंगांच्या विशेष निवासी व अनिवासी १२३ शाळा/कर्मशाळांना अटी/शर्ती/ तपासणीच्या अधीनतेने अनुदान देण्यास मंत्रीमंडळाची मान्यता प्राप्त झाली होती. त्यानुसार दि.८.४.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्याअनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांचे मान्यतेनुसार दि.१८.१.२०१८ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यानुसार ६० शाळांना १०० टक्के अनुदान, ६० शाळांना ५० टक्के अनुदान देण्याबाबत आणि ३ शाळा बंद असल्याने त्यांची तपासणी करुन निर्णय घेण्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत. तद्नंतर खालील ५ शाळा/कर्मशाळांना १०० टक्के अनुदान तत्वावर घेण्यास मा.मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णय दि.१८.१.२०१८ मधील परिशिष्ट-ब मधील खालील ५ शाळा/ कर्मशाळांना १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

अ.क्र.	शाळेचे नाव	मान्य विद्यार्थी संख्या		
		निवासी	अनिवासी	एकूण
१	ज्ञानवर्धिनी शिक्षण प्रसारक मंडळ व सेवाभावी संस्था, परभणी संचलित श्री.साई अपंग निवासी विद्यालय, सेलू, ता.सेलू, जि.परभणी,	५०	-	५०
२	रामपुत्र सेवाभावी संस्था संचलित श्री.साईबाबा अपंग व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, सेलू, जि.परभणी,	२५	-	२५
३	स्नेहदिप एज्युकेशन सोसायटी, मसाळा, जि.वर्धा संचलित निवासी मुकबधिर विदयालय, राळेगांव, जि.यवतमाळ,	४०	-	४०

४	झंझावत बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था, अपूर्वा गणेशनगर, जि.नागपूर संचलित दि मातोश्री शोभाताई मुलामुलींची मतिमंद निवासी शाळा, श्रीकृष्णनगर, नागपूर.	४०	-	४०
५	झंझावत बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था, अपूर्वा गणेशनगर, जि.नागपूर संचलित दि मातोश्री शोभाताई भाकरे मतिमंद मुला मुलींची कर्मशाळा,गणेशनगर, नागपूर, जि. नागपूर,	४०	-	४०

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०५०५१४५४२६८७२२ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2018.05.05 14:58:31 +05'30'

(ज्ञा.ल.सुळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा.मंत्री (सामाजिक न्याय),यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३) मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद), विधान भवन, मुंबई ४०० ०३२.
४) मा.राज्यमंत्री, (सामाजिक न्याय),यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई४०० ०३२.
५) सचिव (सामाजिक न्याय), यांचे स्वीय सहायक, मुंबई ४०० ०३२.
६) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग.
८) सर्व समाज कल्याण अधिकारी.
९) महालेखापाल, (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
१०) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
११) सर्व जिल्हा कोषाधिकारी.
१२) निवडनस्ती / संग्रह नस्ती (अपंग कल्याण -१).

*****